# खेरवाडी पोलीस ठाणे
# Kherwadi Police Station,
## Mumbai
Government Colony, Bldg., No. 5, Gr. Floor,
Bndra (E), Mumbai – 400 051.
☎ 022-26570877, Fax - 26571216
Mail to –
ps.kherwadi.mum@mahapolice.gov.in

O.W.No. /**Kw**PS/2026 Date: 17/04/2026.

## ***PRESS NOTE***

**बांद्रा पूर्व येथील रत्यावर झालेल्या खूनातील मुख्य आरोपीतस, खेरवाडी पोलीसांनी ६० तासात अटक केलेबाबत**

दिनांक १३/०४/२०२१ रोजी १४.२० चे दरम्यान कल्पतरू स्पार्कल, बांद्रा पूर्व, मुंबई ५१ येथील रत्यावर अभिनवकुमार कुमार यास काही अनोळखी इसमाने बाजूला घेवून त्यास चाकूने मानेवर गंभीर वार करून त्याचा खून करून पळून गेले असता खेरवाडी पोलीस ठाणेस गु.र.क्रं. १८५/२०२६ कलम १०३(१), ३(५) भा.न्या.सं. सह कलम ३७(१)(अ), १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हयाचा तपास खेरवाडी पोलीसांकडून करण्यात आला असता त्यामधील मुख्य आरोपीस ६० तासाच्या आत खेरवाडी पोलीसांनी नेताजी सुभाषचंद्र एअर पोर्ट, कलकत्ता येथून तो पळून जात असताना अटक केली आहे, सद्यस्थीत आरोपी पोलीस कोठडीत आहे.

नमुद गुन्ह्याचे गांभिर्य पाहुन वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली दोन पथके तयार करण्यात आली, मयत इसम अभिनव याचे प्रितीकुमारी नावाच्या मुलीसोबत प्रेमसंबध होते. तसेच प्रितीकुमारीचे लग्न हे निरजकुमार नावाच्या मुलासोबत तिच्या आईवडीलांनी ठरवले होते. निरजकुमार याच्यासोबत लग्न करण्यास प्रितीकुमारी तयार नव्हती. याचा राग मनात धरुन निरजकुमार याने त्याच्या साथिदारांसोबत मिळुन अभिनव यास त्यास बांद्रा पूर्व येथे गाठून त्याचा चाकूने मानेवर वार करून खुन केला असे तपासात निष्पन्न झाले. मिळालेल्या माहितीच्या आधारे तसेच तांत्रीक तपास करुन निरजकुमार याच्या शोधासाठी एक पथक नागपुर व दुसरे कोलकत्ता येथे रवाना करण्यात आले. परंतु आरोपीताने मुंबई ते कोलकत्ता प्रवासादरम्यान तिन ते चार वेळस ट्रेन बदलल्या आहेत असे तांत्रिक तपासाच्या आधारे दिसून येत होते. यांनतर आरोपी– निरजकुमार बिलास चौधरी वय ३१ वर्ष– हा कोलकत्यात, हावडा स्टेशनला उतरला असल्याचे दिसून आले परंतू पुन्हा तो वेगवेगळ्या ठिकाणी जात असल्याने त्याचा शोध घेवुन देखील तो मिळुन आला नाही. त्यानंतर पोलीस शोधत आहेत असा संशय आल्याने तो त्याच रात्री कोलकात्याहुन पळुन जाण्याच्या तयारीत होता. कोलकात्याहुन तो दिल्लीला पळुन जात असल्याचे पुन्हा तांत्रीक तपासावरून दिसून आले असता नेताजी सुभाषचंद्र बोस एअरपोर्ट येथुन फ्लाईट बोर्डींग करत असतांना CISF च्या अधिकारी व एअरपोर्ट वरील कर्मचाऱ्यांच्या मदतीने त्यास ताब्यात घेऊन नेताजी सुभाषचंद्र बोस आंतरराष्ट्रीय एअरपोर्ट पोलीस ठाणेस कोलकत्ता येथे त्यास शेवटी अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही माननीय अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग,मुंबई श्री. परमजीतसिंग दहिया. मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०८, श्री. मनीष कलवानिया, मा.पो.आ. खेरवाडी विभाग, श्री. संजय गायकवाड, मा.व.पो.नि. सुप्रिया पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

प्रथम तपासी अधिकारी : पोउनि विठ्ठल आटोळे
तपासी अधिकारी . पोनि सविता माळी

तपास पथक .
१. पोउनि सचिन पाटील
२. पोउनि प्रदिप लोंढे
३. पोउनि चेतन पवार
४. पोउनि संजय घोसाळकर (तांत्रीक मदत)
५. पोहक्र. ०६०९७८ ठोंबरे
६. पोहक्र ०८०९९६ ठाकरे
७. पोशिक्र १११५६२ गायकवाड (तांत्रिक मदत)
८. पोशिक्र १११२६२ अमित शिंदे
९. पोशिक्रं १३००५३ प्रसाद पडवळकर